दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता





vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२० ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 20 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 62 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही:मुख्यमंत्र्यांची ग्वाही

## ओबीसींचे खरे कैवारी देवेंद्र फडणवीस-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



दैनिक वादळ वार्ता

**नागपूर (वृत्तसंस्था)**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ओबीसी समाजासाठी आपल्या सरकारने केलेल्या कामांचा पाढा वाचला. मराठा आरक्षणावरून ओबीसी समाजात असलेली अस्वस्थता लक्षात घेऊन त्यांनी यावेळी महत्त्वपूर्ण विधान केले. फडणवीस म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात ओबीसी वसतिगृहांची केवळ घोषणा झाली होती, मात्र आम्ही सत्तेत आल्यानंतर ६० नवीन ओबीसी वसतिगृहे सुरू केली. तसेच, १० लाख ओबीसींना हक्काची घरे दिली आणि समाजासाठी असलेली आर्थिक महामंडळेही मजबूत केली.देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, आपण महाराष्ट्रात कधीही जाती-पातीमध्ये भेदभाव केला नाही, कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील १८ पगड जातींना सोबत घेतले होते. त्यामुळे कोणत्याही समाजावर अन्याय करण्याची सरकारची भूमिका नाही. यावेळी त्यांनी ओबीसी समाजाला आश्वस्त केले की, मराठा समाजाला न्याय देत असताना, ओबीसी समाजाच्या आरक्षणावर किंवा हक्कांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही.दरम्यान, मराठा आरक्षणासंदर्भात २ सप्टेंबर २०२५ रोजी सरकारने काढलेल्या जीआरमुळे सध्या ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील या जीआरमुळे ओबीसी समाजात आपल्या आरक्षणाला धक्का बसण्याची भीती निर्माण झाली असून, हा जीआर रद्द करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन ओबीसी समाजासाठी महत्त्वाचे मानले जात आहे.



याच मुद्द्यावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, हा आदेश फक्त मराठवाड्यातील चार जिल्ह्यापुरता मर्यादित आहे, असे असताना काँग्रेस नेते यावर राजकारण करत असून विदर्भातील ओबीसी समाजाचे आरक्षण गेले म्हणून म्हणून मोर्चा काढत होते. मात्र, देवेंद्र फडणवीस असेपर्यंत ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार आहे. बबनराव तायवाडे पण ते सांगत फिरत आहेत. मात्र काँग्रेस नेते ऐकायला तयार नाहीत. ओबीसींचे खरे कैवारी हे देवेंद्र फडणवीस असल्याचे बावनकुळे म्हणाले.

## गंगामसला पंचायत समिती सर्कल मधून गोविंद धुमाळ निवडणूक लढण्यास इच्छुक

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) तर्फे गंगामसला पंचायत समिती सर्कल मधून निवडणूक लढविण्याची इच्छा कार्यकर्ते गोविंद धुमाळ यांनी व्यक्त केली आहे. गंगामसला व परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाळे गेल्या काही वर्षांत मजबूत झाले असून, गोविंद धुमाळ हे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. ते जनसंपर्कात निपुण आणि सामाजिक कार्यातून परिचित आहेत. ग्रामविकास, शिक्षण आणि शेतकरी प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने भूमिका घेतली असल्यामुळे स्थानिक जनतेत त्यांच्याबद्दल चांगला प्रतिसाद दिसून येत आहे.

पक्षातील कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक नागरिकांनीही गोविंद धुमाळ यांच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. येत्या पंचायत समिती निवडणुकीत त्यांचा सहभाग स्थानिक राजकारणात उत्सुकतेचा विषय ठरत आहे.गंगामसला परिसरात निवडणुकीची सरगर्मी हळूहळू वाढू लागली असून विविध राजकीय पक्षांचे संभाव्य उमेदवार आपापले कार्यक्षेत्र मजबूत करण्यासाठी जनसंपर्क मोहिमा सुरू करत आहेत. या पार्श्वभूमीवर गोविंद धुमाळ यांची इच्छुकता हे गटातले राजकारण रंगविणारे पाऊल ठरत आहे.

## नाम फाउंडेशन तर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देणार

### कुर्ला येथे अजित देशमुख यांच्या हस्ते बियाणे वाटप

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**



पूरग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन यांच्यातर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. आज कुर्ला येथील २०० शेतकऱ्यांना या बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड .अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.सिने अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनने सामाजिक उद्दिष्ट समोर ठेवून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला आहे. एक हजार शेतकऱ्यांना प्रत्येकी तीस किलो हरभऱ्याचे बी आणि आठ किलो ज्वारीचे बी देण्यात येणार आहे.कुर्ला येथे अतिवृष्टीसह मोठ्या पुराच्या पाण्यात लोक देखील अडकले होते. शेतीचे या ठिकाणी मोठे नुकसान झालेले आहे. पुरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाची स्वतंत्र टीम बाहेरून मागवण्यात आली होती. त्यामुळे या शेतकऱ्यांना मदतीची आवश्यकता होती. स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव तुषार पाटील यांच्यासह रत्नाकर मार्कड घोडके सर, गोवर्धन मस्के आणि इतरांनी या कामी पुढाकार घेतला. आज या ठिकाणच्या दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात आले यावेळी ड देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले बियाणे पेरून चांगल्या प्रकारचे उत्पादन घ्यावे आणि नामचा उद्देश साध्य करावा, असे त्यांनी यावेळी म्हटले. तुषार पाटील यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. गावातील जवळपास दोनशे शेतकरी त्याचबरोबर उपसरपंच देखील यावेळी उपस्थित होते.

## शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक लाखाची मदत

### शेतकऱ्यांसाठी संस्थेचा प्रेरणादायी उपक्रम-माजी आमदार मोहनराव (काका) सोळंके यांचा नेहमीच असतो मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**



शिक्षण क्षेत्रात आदर्श ठरलेली शार्दुलेश्वर शिक्षण संस्था, माजलगाव ही संस्था सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. संस्थेने शिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये नेहमीच पुढाकार घेत बी-बियाणे, खते, विहिरी खोदकाम तसेच कृषी संशोधनासाठी विविध प्रकारे मदत केली आहे.

राज्य शासनाने सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक दिवसाचा पगार देण्याचे आवाहन केले असताना, शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण चार लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अर्पण केले होते.यानंतरही संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने अतिरिक्त एक लाख रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाला सुपूर्द केला आहे. हा धनादेश संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार मोहनराव (काका) सोळंके यांच्या कडुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आला.या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, शिक्षणासोबतच शेतकरीहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या संवेदनशील दृष्टिकोनाचे हे आणखी एक उदाहरण ठरले आहे.

## औसा शहराच्या विकासासाठी काँग्रेस पक्षाचा विचार मंथन व स्नेह संवाद कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**औसा । खालेद काझी**




औसा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वतीने औसा शहरातील विविध क्षेत्रातील प्रतिनिधींशी औसा शहराचा विकास आणि सकारात्मक राजकारण या विषयावर विचार मंथन व स्नेह संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात वैद्यकीय, शिक्षण, व्यापारी, विद्यार्थी, महिला, आध्यात्मिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच विविध सामाजिक संघटनांमधील प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उपस्थितांनी औसा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मुद्द्यांवर चर्चा केली. कार्यक्रमात नागरिकांनी औसा शहराच्या भविष्यासंदर्भात अनेक महत्त्वाचे विकास विषय मांडले. शहराचा शाश्वत व संतुलित विकास, धार्मिक सलोखा, रोजगार निर्मिती, शिक्षण व आरोग्य सुविधा या विषयांवर भर देण्यात आला.काँग्रेस पक्षाने नागरिकांच्या अपेक्षा आणि सूचनांना न्याय देत औसा शहराच्या विकासाचा ठोस आराखडा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की, आगामी निवडणुकीच्या माध्यमातून औसा शहरात सकारात्मक व विकासाभिमुख राजकारणाची नवी दिशा दिली जाणार आहे.

## नांदगाव येथील जेष्ठ नागरिक गणपतराव राऊत यांचे दुखःद निधन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक माजी सरपंच इंजि गणपतराव भाऊ रंगनाथ राऊत वय ८१ वर्ष यांचे पुणे येथे दि.१८ आक्टोबर शनिवार रोजी उपचारा दरम्यान दुखःद निधन झाले.तत्कालीन सरपंच असताना आनंदगाव ला एक गाव एक पाणवठा पुरस्कार प्राप्त झाला होता.भाऊ कंत्राटदार म्हणूनही ते सर्व परिचित होते.रविवारी दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता पाथरा येथील शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आले.

त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले नानासाहेब, बाळासाहेब,दिलीप व एक मुलगी,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## फटाके मुक्त दिपावली, पर्यावरणीय दिपावली साजरी करूया,आरोग्य दायी व आनंददायी जीवन जगू या-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

फटाकेमुक्त,आरोग्यदायी दिपावली साजरी करूया, आरोग्यदायी वआनंददायी जीवन जगूया यासाठी प्रत्येक नागरिकाने याची दक्षता घ्यावी असे आवाहन जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते तथा आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीडचे संस्थापक अध्यक्ष,प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी सर्व जनतेला आवाहन केले आहे.दिपावली हि आनंददायी वआरोग्यदायी साजरी करण्यासाठी प्रत्येकाने फटाकेमुक्त व पर्यावरणीय दिपावली साजरी करावी असे अवाहन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. फटाके फोडल्यामुळे प्रदूषण हे पर्यावरणाला हानीकारक व नुकसान दायक आहे,तसेच प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यासाठी ही घातक व अपायकारक आहे.आर्थिक,शारीरिक, आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक हानी टाळण्यासाठी सर्वांनी फटाकेमुक्त दिपावली साजरी करावी असे आवाहन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले आहे.

## संपादकीय

# याला जबाबदार कोण?




सध्याच्या परिस्थितीत बेस्ट उपक्रम हा व्हेंटिलेटरवर आहे. या बेस्ट उपक्रमात कार्यरत आणि सेवानिवृत्त मराठी सेवक वर्गाचे लचके तोडण्याचे कार्य गेली ३० ते ३५ वर्षे सातत्याने मुंबई महानगरपालिकेत सत्तेत असणारे नियोजनशून्य शिवसेना उबाठाची बेस्ट समिती सर्वस्वी जबाबदार आहे आणि याचाच राग बेस्टच्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीत काढला. या निवडणुकीत समर्थ कामगार संघटनेचे संस्थापक नेते खासदार नारायण राणे यांच्या सूचनेनुसार बेस्ट पतपेढी निवडणुकीत समर्थ बेस्ट कामगार संघटनेच्या अथक प्रयत्नाने आमदार प्रसाद लाड यांनी घेतलेल्या पुढाकाराने बनवलेल्या सहकार समृद्धी पॅनल आणि शशांकराव पॅनलच्या सहकाऱ्यांनी २१-० असा पराभव करून ठाकरे ब्रँडचा बँड वाजवला व शिवसेना उबाठाच्या बेस्ट कामगार सेनेला बेस्ट उपक्रमाच्या बेस्ट पतपेढीतून बाहेरचा रस्ता दाखवला. बेस्ट पतपेढी निवडणुकीच्या प्रचारात समर्थ कामगार संघटनेचे सरचिटणीस विलास पवार यांनी विशेष मेहनत घेतली होती.सन २०१९ ला अस्तित्वात असणाऱ्या शिवसेना (उबाठा)च्या बेस्ट समितीने बेस्ट उपक्रमाच्या अखत्यारित असलेली बसआगारे, बसस्थानके पुनर्विकास करण्याच्या नावाखाली विकासकांना देऊन त्यातून बेस्ट उपक्रमाला उत्पन्न देणारी रक्कम अजूनही बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत आलेली नाही, थकबाकीच आहे, याबाबत प्रशासन आणि तात्कालीक बेस्ट समिती उत्तर देणार की नाही, तसेच बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाच्या मोठ्या, लहान वीज ग्राहकांची थकबाकी लाख, करोडच्या रकमेत आहे ती ही वसूल करताना बेस्ट उपक्रमाच्या नाकी नऊ येत आहेत. वरील थकबाकी जर वेळेवर वसूल झाली असती तर बेस्ट उपक्रम आर्थिक व्हेंटिलेटरवर गेला नसता आणि सेवकवर्गाची थकीत देणीही थोड्या प्रमाणात वेळेवर प्रदान करण्यात आली असती, ही वस्तुस्थिती आहे याला नियोजनशून्य उबाठाची बेस्ट समिती आणि प्रशासनातले झारितले शुक्राचार्य सर्वस्वी जबाबदार आहेत.सद्यस्थितीत बेस्ट उपक्रमातील सेवकवर्गाला मिळणाऱ्या सानुग्रह अनुदानाच्या (बोनस) प्रश्नावर शिवसेना उबाठा यांच्या प्रतिनिधिक कामगार संघटनेने राजकारण करत सेवकवर्गाला वेठीस धरत आगारा-आगाराबाहेर निदर्शने करण्याची योजना आखली होती; परंतु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार, समर्थ बेस्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष मंत्री नितेश राणे, मंत्री आशीष शेलार आणि आमदार प्रसाद लाड, तसेच मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी आणि बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी या मान्यवरांच्या पुढाकाराने दि.१६ ऑक्टोबर रोजी मुंबई महानगरपालिकेला आणि बेस्ट उपक्रमाला रुपये ३१ हजार-इतके सानुग्रह अनुदान (बोनस) जाहीर करण्यात आले, त्यामुळे शिवसेना उबाठाच्या कामगार संघटनेचा फियास्को झाला. खोटं बोल पण रेटून बोल या शिवसेना उबाठाच्या प्रवृतीला महायुतीने चपराक दिली आणि बोनस देण्याचा कामगार हिताचा निर्णय घेऊन बेस्टच्या सेवकवर्गाच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बेस्टच्या २५ ते ३० हजार सेवक वर्गाच्या घरची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे.बेस्ट उपक्रमाच्या सेवकवर्गाकडून यासाठी मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद. देण्यात आले. मात्र यातही पालिकेने बेस्टला सानूग्रह अनुदान देताना वेगळी रक्कम न देता जी आर्थिक मदत दर वर्षासाठी करण्यात येते त्यातून कापून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; परंतु असं सध्या तरी कर्मचाऱ्यांच्या घरची दिवाळी गोड होणे महत्त्वाचे. वर्षानुवर्षे मुंबई महानगरपालिकेवर सत्ता भोगलेल्या उबाठा शिवसेनेने मुंबईत मराठी माणूस टिकावा यासाठी नेमके केले तरी काय? आज खरा मुंबईकर हा मुंबईच्या बाहेर फेकला गेला मात्र तेच अनधिकृतरीत्या झोपडपट्ट्या बांधून राहिलेले उपरे मात्र शासनाच्या निरनिराळ्या योजनेमुळे खरे मुंबईकर झाले. मात्र खरा मुंबईकर मुंबई बाहेर गेल्यामुळे शिवसेनेची खरी वोट बँक मुंबई बाहेरून मुंबईत प्रवास करून कामावर येऊ लागली. याचा थोडाफार फटका हा शिवसेनेला बसणारच होता. मात्र त्यावेळेस हा मुंबईकर मुंबई बाहेर जाऊ नये म्हणून शिवसेनेतर्फे पद्धतशीरपणे कोणतेही प्रयत्न केले गेले नाही.आज मुंबई महानगरपालिका बेस्ट यासारख्या संस्थांमध्ये काम करणारा कर्मचारी वर्ग हा रोज दोन ते अडीच तास लोकलमध्ये लटकून प्रवास करून मुंबईत येत आहे, मात्र दुसरीकडे मुंबई महानगरपालिकेच्या अखंड भूखंडांवर अनधिकृत अतिक्रमणे उभी राहिली. त्याचं जर का मुंबई महानगरपालिकेच्या वसाहती उभारल्या गेल्या असत्या तर आज शिवसेनेची अखंड वोट बँक उभी राहिली असती तर दुसरीकडे बेस्टच्या सध्या मोठमोठ्या वसाहती आहेत, त्यांचे जर पद्धतशीरपणे नियोजन करून त्यांचा पुनर्विकास केला गेला असता तर आज जो ७० टक्के कर्मचारी वर्ग हा मुंबई बाहेरून बेस्ट मध्ये कामाला येत आहे तो आज मुंबईत राहून त्याने नोकरीवर कर्तव्यपूर्तता केली असती. दोन आठवड्यापूर्वी बेस्टबद्दल जो कळवळा उबाठा पक्षास आला होता तो जर त्या वेळेला असता तर आज ऊबाठा पक्षाची ही चिंताजनक अवस्था झाली नसती. त्यामुळे बेस्टच्या या सर्वस्वी अवस्थेला नेमके जबाबदार कोण आहे हे सर्वसामान्य कर्मचारी तसेच मुंबईकरांनाही ठाऊक आहे.

# खरेदीची लाट अन् दिवाळीची धूम



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जीएसटी कपातीचा निर्णय घेतल्यानंतर बाजारात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झालेले दिसू लागले आहे. नवरात्रीत दिवाळी खरेदीसाठी जोरदार खरेदीची लाट उसळली होती. पण दिवाळीतही ही लाट कायम आहे आणि जीएसटी कपातीच्या रूपाने भारताला ही भेट मिळाली आहे असे समजले जात आहे. पण सर्वात जास्त फायदा ई कॉमर्सच्या व्यवसायाला आलेल्या झळाळीमुळे आहे. यंदाच्या दिवाळीमध्ये बाजारपेठांमध्ये अतिरिक्त उत्साह निर्माण झाला आहे. कारण ग्राहक लक्षणियरीत्या खर्च करत आहे आणि त्यांची क्रयशक्ती वाढली आहे.त्यांच्या जोडीला जीएसटी कपात मदतीला आहे आणि कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही कामगिरीने उत्साहाचे वातावरण आहे. सहसा कोणताही सणांचा उत्सव हा अर्थव्यवस्थेला चालना देणाराच असतो. तो प्रमुख आर्थिक कॅटलिस्टही असतो. त्यांचे अनेक घटक आहेत जसे की या काळात ग्राहकांची खरेदीचा उत्साह उतू जात असतो आणि खर्च अतोनात केला जातो. वास्तविक भारताची परिस्थिती आज काही वर्षापूर्वी होती तशी नाही. आज भारताचा ग्राहक खिशात बऱ्यापैकी पैसे धेऊन दुकानात जात असतो. महागड्या वस्तू खरेदी करत असतो. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इडस्ट्रीजने सांगितले, की दिवाळी हे वाढीचा सर्वात महत्त्वाचा घटक असतो आणि ते यंदा दिसले आहे. दिवाळीच्या दिवसात सुवर्णाची खरेदी आणि गृहोपयोगी वस्तूंची खरेदी जोशात केली जाते.यंदाही ती लाट दिसते आहे. तसेच पारंपरिक आणि ऑनलाईन रिटेलर्सची विक्री वाढली आहे. यामुळे बाजारात खरेदीची धूम आणि ग्राहकांची अतोनात गर्दी दिसून येते. यंदा दिवाळीची खरेदी किती झाली ही आकडेवारी आज समोर नसली तरीही अगदी काही दिवसांत ती समोर येईल आणि ती रेकॉर्ड ब्रेक असेल असा अदाज आहे. फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन या ई-कॉमर्सच्या विशाल कंपन्यांकडे प्रचंड मागण्या आहेत आणि त्या पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत. वाढत्या किमती असूनही सोन्याच्या खरेदीला उत आला आहे. रिझर्व्ह बँकेने नवीन नियम घालून दिल्यानुसार सोने खरेदी आणि सोन्यावर कर्ज मिळवणे सोपे झाले आहे ही ग्राहकांच्या समाधानाची बाब आहे.दिवाळी हा सण संपत्ती निर्मिती आणि व्यापारी आकार वाढवण्यासाठी शुभ समजला जात असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा सण उत्साहाने भारलेला असतो. त्या दृष्टीने मोदी सरकारने आल्यापासून जनतेला एकापेक्षा एक भेटी देण्याचे ठरवले आहे आणि त्यापैकीच आहे जीएसटी कपात. जी एसटी कपातीमुळे ग्राहकांच्या खिशातील बराचसा पैसा वाचला असून तो आपोआपच बाजारात ओतला जात आहे. जीएसटी २.० मुळे अनेक वस्तूंच्या किमती जनतेच्या आवाक्यात आल्या आहेत आणि आयकर सुधारणांमुळे उपभोग आणि खासगी भांडवली खर्च आटोक्यात आला आहे. दिवाळी खरेदीमुळे किरकोळ विक्री वाढते आणि उत्पादनाला चालना मिळते आणि अर्थव्यवस्थेत मोठी उलाढाल होते. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. यंदाच्या दिवाळीच्या उत्साहात ग्राहक कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि घरगुती वस्तूंच्या खरेदीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला गेला आहे. हे दिसतेच. या काळात मागणी वाढल्यामुळे कंपन्यांना अधिक उत्पादन करावे लागते आणि त्यामुळे उत्पादनाला चालना मिळून रोजगार निर्मिती जोरदार होते. त्यात यंदा जीएसटी कपातीचा शॉक नसल्यामुळे किंवा बराचसा कमी झाल्यामुळे ग्राहकांच्या खिशात पैसा अधिक वाजू लागला आहे. दिवाळीमुळे कर महसुलात वाढ ही चांगलीच होते आणि ही बाब आर्थिक वाढीसाठी उत्साहवर्धक असते.दिवाळी हा केवळ प्रकाशाचा सण नाही तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही तो एक प्रकाशमान सण आहे. हा सण अर्थव्यवस्थेला चालना देणारा आहे. त्यामुळे भारतात ग्राहकांच्या संख्येत अविश्वसनीय वाढ झाली आहे. यंदाच्या दिवाळीत ४ ते ४.२५ कोटी लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. २०१९ पासून ते २०२५ पर्यंत दिवाळीच्य ग्राहकांनी केलेल्या खर्चात अनपेक्षित वाढ झाली आहे. २०२४ मध्ये तो दिवाळीला ४.२५ लाख कोटी होता. यंदा तो यापेक्षाही अधिक असण्याची अपेक्षा आहे. यंदा बरेच ग्राहक ऑनलाईन खरेदीकडे वळल्याने ई कॉमर्सच्या व्यवसायात प्रचंड वाढ झाली आहे आणि २०१९ मध्ये ३५ हजार कोटी रुपयांवरून ई कॉमर्सचे मूल्य १.२ लाख कोटी रुपयांपर्यंत गेले आहे.दिवाळी खरेदीसाठी रस्ते ओसंडून वाहत आहेत आणि नेहमीप्रमाणे वाहतूक कोंडी होऊ लागलीय. पण सोने खरेदीसाठी याच काळात ग्राहकांची झुंबड उडते. यंदा सोन्याची विशेषतः खरेदी विक्रमी झाली ती आहे ती एक लाख कोटी रुपये. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात यंदा २५ टक्के वाढ झाली आहे. एकाच दिवशी एक लाख कोटी रुपयांची विक्री ही सोन्याचा उच्चांक तर आहेच पण तो विक्रमी आहे. तितकीच चांदीची विक्रीही झाली आहे. सोन्याकडे ग्राहकांचा कल वाढतो आहे आणि त्यामुळे सोन्याच्या खरेदीत वाढ होणे साहजिक आहे. दिवाळी हा सण शुभ मानला जातो आणि त्यामुळे पारंपरिक उत्साहात जाऊन लोक खरेदी करत असतात. दिवाळीच्या दिवशी सर्वच व्यवसायांसाठी तेजीचे दिवस असतात आणि त्यमुळे ग्राहकांच्या खिशात पैसा ओसंडून वाहत असतो.त्यामुळे यंदा बाजारात ग्राहकांची रेलचेल दिसत आहे. संपूर्ण देशभरातील आकडेवारी नाही तरी जी आकडेवारी आहे ती प्रातिनिधिक म्हणावी लागेल. त्यानुसार ही सोन्याचांदीच्या वस्तुंच्या विक्री झाली ती ६० हजार कोटी रुपये तर किचन घरगुती वापराच्या वस्तूंची विक्री झाली ती १५ हजार कोटी रुपये. इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तूंची विक्री पोहोचली ती यंदा १० हजार कोटी रुपये. मेवा मिठाईची विक्री झाली ती १२ हजार कोटी रुपये. यावरून ग्राहकांची पोझिशन कळते आणि त्यावरून हा निष्कर्ष निघतो की दिवाळी असो की सणासुदीचे दिवस असो ती इलेक्शन, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे इंजिन्स आहेत.

# कोकण विकासाचा ‘पर्यटन’ मार्ग



महाराष्ट्राच्या विविध भागांच्या विकासाचा विषय चर्चेला येतो तेव्हा विकासावर चर्चा होताना विशेषकरून कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या चारही जिल्ह्यांमध्ये नव्याने उद्योग येण्याविषयी सुतोवाच झालं की त्याला विरोधाच निशाण फडकवलेलं असत. यामुळे औद्योगिक क्षेत्राला होणारा विरोध कोकणातील तरुणांना रोजगारापासून दूर ठेवण्यासारखे आहे. आज कोकणात आयटी कंपन्या नाही. कोकणातील अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले हजारो तरूण रोजगाराच्या संधी शोधत पुणे, मुंबई, नाशिक, नागपूरसारख्या मोठ्या शहरांमध्ये धाव घेताना दिसतात. यामुळे केवळ कोकणात रोजगार उपलब्ध नाही म्हणून बाहेर जाणाऱ्या या तरुणांमुळे कोकणातील गावो-गावी वयोवृद्ध आई-वडील राहतात. यात एक संधी पर्यटन व्यवसायाच्या निमित्ताने कोकणाला खुणावतेय. पर्यटन व्यवसायाला आवश्यक असणारे वातावरण दुर्दैवाने आजही कोकणात निर्माण होऊ शकले नाही.पर्यटनासाठी कोकणामध्ये हजारो पर्यटक दरवर्षी येत आहे. कोकणामध्ये १९९७ मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला. रायगड जिल्ह्यामध्ये बऱ्यापैकी उद्योग उभे आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात जसा पर्यटन व्यवसायाला वाव आहे. त्याचबरोबर औद्योगिकीकरणही झालेलं आहे. पालघरमध्येही तिथल्या नैसर्गिकतेने पर्यटन वाढत आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. कोकणच्या किनारपट्टीवर पर्यटकांची संख्या नेहमीच वाढत चालली आहे; परंतु आजही अनेक पर्यटनस्थळांवर सुखसोईंचा अभाव आहे. पर्यटनस्थळांवर सहज ये-जा करण्यासाठी रस्ते नाही. पर्यटनवाढीच्या दृष्टीने कोकणातील पर्यटनस्थळ जगाच्या पर्यटन नकाशावर येण्यासाठी तशाप्रकारे प्रयत्न झाले पाहिजे. कोकणातील पर्यटन विकासाचा शाश्वत आराखडा तयार झाला पाहिजे. पुढच्या पंचवीस-पन्नास वर्षांचं नियोजन होण्याची आवश्यकता आहे. निसर्गाने कोकणाला भरभरून दिलेलं आहे. सृष्टी सौंदर्याने नटलेलं, सजलेलं आपल कोकण आहे; परंतु कोकणातील अनेक पर्यटन स्थळ दुर्लक्षित आहेत. काही ठरावीक पर्यटनस्थळांवर पर्यटक मोठ्या संख्येने जातात; परंतु अनेक खुप सुंदर दिसणारी, असणारी पर्यटनस्थळ पर्यटनाच्या उंबरठ्यावरच उभी आहेत.कोकणात कोणत्याही उद्योग प्रकल्पाची चर्चा सुरू झाली, की त्या प्रकल्प विरोधी समिती पहिल्यांदा तयार होते आणि प्रकल्प आपल्याकडे कसा येणार नाही याची फार पद्धतशीर काळजी विरोधी सूर आळवणारे घेतात. यामुळे गेल्याकाही वर्षात रत्नागिरी, सिंधुदुर्ग रायगड जिल्ह्यात एकही उद्योग उभारणी घेऊ शकलेला नाही. कोकणात कोणताही प्रकल्प आणताना उद्योजकही फार विचार करतात अशी स्थिती आहे. केवळ यामुळेच एकही प्रकल्प आलेला नाही. यात सर्वात दुर्दैव म्हणजे कोकणविकासाचा विषय अनेकवेळा राजकीय इश्यू म्हणून त्याचा वापर केला जातो. निवडणुका जवळपास आल्या की कोणत्याही प्रकल्पांना विरोध करणारे गळा काढणारे उठून उभे रहातात. निवडणुका झाल्या की विरोध करणारे जाग्यावर बसतात. प्रकल्पांना वारंवार विरोधच होत असल्याने प्रकल्प आणणारी कंपनी विरोध असताना जाणीवपूर्वक कशासाठी प्रकल्प उभा करण्याचा अट्टाहास करत बसणार. आजवर कोकणातील विरोधी वातावरणाने अनेक प्रकल्प कागदावरच राहिले. त्या प्रकल्पांची कोकणात प्रकल्प होणार म्हणून केवळ चर्चा झाली; परंतु पुढे काही घडले नाही.अशा अनेक कागदावरच्या प्रकल्पांनी कागदावरच गाशा गुंडाळला. साहजिकच यामुळे कोकणात प्रकल्प नकोच अशी वातावरण निर्मिती उद्योग क्षेत्रात झाली आहे. ही बाब कोकणच्या विकासाच्यादृष्टीने फार गंभीर आहे. यामुळे कोकणात विकास प्रकल्प उभे राहूच शकले नाहीत. बर ज्यांनी-ज्यांनी आजवर कोकणात येणाऱ्या प्रकल्पांना विरोध केला त्यातल्या कुणीही आजवर एखादा उद्योग, प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न केलेले नाहीत; परंतु विरोध करायला मात्र या सर्वांचाच पुढाकार असतो. कोकणातील या अशा सर्व मानसिकतेत शेवटी कोकणाला पर्यटन व्यवसायाशिवाय पर्याय नाही. कोकणातील निसर्ग सौंदर्याचा विचार करता कोकणात आणखी मोठ्या प्रमाणावर पर्यटन व्यवसाय वाढला पाहिजे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये कोकणच्या किनारपट्टीवर पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या फार मोठी आहे; परंतु आज ज्या प्रमाणात पर्यटक येतात त्यापेक्षाही कितीतरी अधिक प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढणे आवश्यक आहे. आज कोकणाला लागून असलेल्या गोवा राज्याची पूर्णपणे अर्थव्यवस्था ही पर्यटनावरच अवलंबून आहे. गेल्या अनेक वर्षात गोवा राज्याने पर्यटन उद्योग केंद्रस्थानी आणला आणि जगभरात पर्यटन नकाशावर गोवा राज्य आणलं गेलं. गोवा, केरळ या राज्यांच्या प्रमाणेच भौगोलिकदृष्ट्या आपलं कोकण आहे. गोवा, केरळ या राज्यांनी पर्यटनातूनच प्रगती केली आहे. कोकणालाही पर्यटनातूनच प्रगती अधिक वेगाने होऊ शकते.राज्यसरकारने कोकणातील पर्यटनव्यवसायाला गती देणारं वेगळं धोरण आणलं पाहिजे; परंतु दुर्दैवाने कोकणातील पर्यटन व्यवसायातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळू शकते. कोकणातील पर्यटनातून राज्याची अर्थव्यवस्था अधिक मजबुत होऊ शकते. हेचमुळी राज्यकर्त्यांना कधी कळलेलं नाही. उर्वरित महाराष्ट्रातील राजकिय नेते कोकणविकासाच्या बाबतीत फार कधी अनुकूल असल्याचे चित्र पाहावयास कधी मिळाले नाही. कोकणातील आजवर पर्यटनमंत्री तर उर्वरित महाराष्ट्रातीलच राहिले आहे. पूर्वी राज्यमंत्रीमंडळानी मंत्र्यांकडे अर्धा डझन खाती असायची. त्यामुळे पर्यटनासारख्या महत्वाच्या खात्याकडे कधी कोणी फार लक्षच दिले नाही. पर्यटन मंत्र्यांना पर्यटन विकासात जर स्वारस्य असेल तरच पर्यटनस्थळांचा विकास होऊ शकेल. राज्याचा पर्यटन विभागही उपेक्षित असल्यासारखे आहे. त्यामुळे कोकणातील जिल्हाधिकारी कार्यालयातून पर्यटन विभाग असतो; परंतु पर्यटन विभागाकडे कोणत्याही योजना नाहीत की आणखी काही नाही.त्यामुळे कोकणातील पर्यटन विकास हा त्या-त्या भागातील पर्यटन व्यवसायात असणाऱ्यांच्या स्वतःच्या प्रयत्नातून होत आहे. गोवा राज्यातूनही पर्यटक कोकणात येत आहे. रायगडचा अलिबाग, हरिहरेश्वर, रत्नागिरी, आवेरे, सिंधुदुर्गातील तारकर्ली, देवबाग अशा किनारपट्टीवरच्या पर्यटनस्थळांवर गर्दी वाढू लागली आहे. यातील काही पर्यटनस्थळांवर बऱ्यापैकी पर्यटन व्यवसाय स्थिरावला आहे. परंतु या सर्वाला ज्या मर्यादा आहेत. पर्यटन व्यवसायाशी संबंधित सर्व व्यवसाय वाढले पाहिजेत. कोकणातील पर्यटनव्यवसायाशी संबंधित असणाऱ्या सर्वांनीच एक मानसिकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. पर्यटन हा व्यवसाय आहे. या व्यवसायातून मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्मितीच्या संधी आहेत. तो प्रयत्न केलाच पाहिजे आणि कोकणातील जनतेनेही पर्यटन व्यवसायातही ज्यांना-ज्यांना ज्या प्रकारचा व्यवसाय आणि सेवा देणे शक्य आहे त्यांनी तो प्रयत्न करायला हवा तर आणि तरच पर्यटन व्यवसायाच्या संधीच सोनं कोकणातील बेरोजगार तरुणांना करता येणं शक्य आहे.

# वांद्रे पश्चिमेतील बीपीई हायस्कूलमध्ये मादक पदार्थ आणि डिजिटल व्यसनाविरुद्ध जागरूकता मोहीम

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

वांद्रे पश्चिम येथील बीपीई हायस्कूलमध्ये गुरुवारी (१६ ऑक्टोबर) 'प्रसार आणि ओळख दिन' या उपक्रमांतर्गत मादक पदार्थांच्या गैरवापराचा धोका आणि डिजिटल व्यसन याविरुद्ध प्रभावी जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्ष श्री. हरीश सुर्वे, मुख्याध्यापक श्री. संताराम महादेव पवार आणि शाळेच्या टीमच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट शाळेच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभादरम्यान विद्यार्थी व पालकांमध्ये सामाजिक, आरोग्य आणि कौटुंबिक समस्यांबाबत जागृती निर्माण करणे हे होते.

चिप (CHIP) मुंबई एनजीओ आणि एम्पॉवर (Empower) संस्थेच्या प्रायोजित व आयोजनाखाली साकारलेल्या या कार्यक्रमाचे समन्वय वांद्रे पोलिस स्टेशन (पश्चिम) यांनी केले. यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र साळुंके, पीआरओ वरिष्ठ पीआय सचिन राणे, एपीआय रौफ शेख, हेड कॉन्स्टेबल नितीन कुंटे, एएसआय देवके आणि एटीएसचे हेड कॉन्स्टेबल शिंदे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'मादक पदार्थांच्या गैरवापराचा धोका आणि डिजिटल व्यसनाचा धोका' या विषयावरील विशेष सत्र. नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय प्रशिक्षक व कार्यकारी समिती सदस्य श्री. बॉस्को डिसोझा आणि सुश्री चेतना सावंत यांनी या सत्राचे मार्गदर्शन केले. जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण (DLSa) आणि बीसीएस - सेंट पीटर्स युनिट, वांद्रे यांचा या सत्राला पूर्ण पाठिंबा होता.अनेक मान्यवर वक्त्यांनी मेळाव्याला संबोधित केले. यात चिप (CHIP) मुंबईच्या विश्वस्त डॉ. सुनीता बॅनर्जी यांनी आरोग्य जागरूकतेवर प्रकाश टाकला, तर बाल कल्याण समितीचे माजी




अध्यक्ष श्री. विजय यू. डूपोडे यांनी झजउडज कायद्याचे महत्त्व आणि पालक-बालक संबंधांवर चर्चा केली. या सत्रांमुळे विद्यार्थी व पालकांना प्रतिबंधक उपाय, संवादाचे महत्त्व आणि कायदेशीर संरक्षण यांचा लाभ झाला.विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या दुष्परिणामांवर आधारित पथनाट्य सादर करून प्रेक्षकांना प्रभावित केले. या नाट्याला रसिकांकडून जोरदार टाळ्यांचा सन्मान मिळाला.कार्यक्रमाचा समारोप पारितोषिक वितरण समारंभ आणि गट छायाचित्रणाने झाला. यावेळी विद्यार्थी व पालकांनी 'ड्रग्जना नाही म्हणा, जीवनाला हो!' या घोषणेत उत्साहाने सहभाग घेतला.सहभागींनी या अर्थपूर्ण आणि संवादात्मक सत्रांचे कौतुक करत भविष्यात अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक सुहाना हाश्मी, सुश्री रिदा, सुश्री आफरीन व त्यांच्या टीमने अप्रतिम केले, तर छायाचित्रणाची जबाबदारी हृतिक नाईक यांनी पार पाडली.

# महाविकास आघाडी आणि मनसेच्या प्रयत्नांना यश जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रातील मतदार यादीत घोळ असल्याचा आरोप करण्यात आल्यापासून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. महाविकास आघाडी आणि मनसेच्या नेत्यांनी सलग दोन दिवस निवडणूक आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर अखेर मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश दिले आहेत. ही बाब राज्यातील निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी मोठे पाऊल मानले जात आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात मतदार यादीतील अनेक त्रुटी आणि घोळ समोर आले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याचा उल्लेख करत महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये मतदार यादीत घोळ असल्याचे ठळकपणे दाखवले. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि मनसेचे नेते आयोगाशी भेट घेऊन पुरावे सादर करत होते. या पुराव्यांमध्ये एकाच घरात शेकडो नावे नोंदलेली असल्याचा उल्लेख होता. नागपूरमध्ये एकाच घराच्या पत्त्यावर २०० मतदार असल्याचे गंभीर आरोप विरोधकांनी केले होते. यासह, जयश्री मेहता या महिलेसाठी दहिसर, चारकोपसह एकूण चार ठिकाणी मतदान नोंदले गेले होते, तर मोहन नंदा बिलवा या महिलेसाठी मतदार यादीत तीन ठिकाणी नाव असल्याचा दावा करण्यात आला होता. या सर्व पुराव्यांनंतर आयोगाचे अधिकारी काही काळ निरुत्तर झाले, पण अखेर जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले गेले आहेत.मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले की, एकाच मतदारसंघात एकाच महिलेसाठी अनेक नावे असल्यास चौकशी करून दोषी अधिकारी असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत आणि दिवाळीनंतर हा अहवाल मिळण्याची शक्यता आहे. अहवाल आल्यानंतर विरोधकांना त्याची प्रत उपलब्ध करून दिली जाईल.राज ठाकरेंकडून करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, मतदार यादीत त्रुटी सुधारल्या शिवाय निवडणुका घेऊ नयेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरही अनेक मतदारांची नावे असून त्याचबरोबर फोटो नसणे, मुलांच्या वयापेक्षा वडिलांचे वय कमी असणे, या प्रकारच्या त्रुटी लक्षात आल्या आहेत. यासह, खोट्या यादीतील नावे माध्यमांवर आल्यावर



गायब होणे, नवीन नावे टाकली जाणे याची माहिती निवडणूक आयोगाला न मिळणे, हे देखील विरोधकांकडून गंभीर आरोप म्हणून मांडले गेले आहेत. महाविकास आघाडीच्या शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड या नेत्यांनी निवडणूक आयोगाशी भेट घेतली आणि यादीतील त्रुटी स्पष्ट करून त्यावर कार्यवाही करण्याची मागणी केली. राज ठाकरे यांनीही या संदर्भात विशेष भूमिका बजावली आणि निवडणूक आयोगाने स्थानिक तसेच केंद्रीय यंत्रणांसह एकत्रित तपासणी करावी, अशी मागणी केली.मतदार यादीतील घोळ आणि त्रुटी केवळ स्थानिक स्वराज्य निवडणुकांपुरती मर्यादित नाहीत; राज्यातील संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंकडून करण्यात आलेल्या मागण्या समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी म्हटले की, मतदार यादीतील माहिती गोपनीय असूनही, यादीतील त्रुटी आणि फोटो नसणे, सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास आयोगाकडे अधिकार असले तरी विरोधकांना का नाही, हा मुद्दा स्पष्ट केला पाहिजे, असे मुद्दे मांडले होते.

## पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा देताच महिलांसाठीचे स्वच्छतागृह सुरू-डॉ.गणेश ढवळे

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड पंचायत समिती कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसह कार्यालयात येणाऱ्या महिला अभ्यागतांसाठी असलेले स्वच्छतागृह पाणीटंचाईमुळे गेल्या अनेक दिवसांपासून कुलूपबंद अवस्थेत होते. प्रवेशद्वारावर बाहेरील शौचालय वापरावे अशी नोटीस लावण्यात आली होती, जी महिलांसाठी अत्यंत गैरसोयीची आणि असुरक्षिततेची बाब ठरली होती.

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख – बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दि.१७ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ प्रशासनाला लेखी निवेदन देऊन या संदर्भात तीव्र निषेध नोंदविला. त्यांनी म्हटले होते की, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना बाहेर शौचालय शोधणे ही केवळ गैरसोय नव्हे, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. तसेच ही घटना स्वच्छ भारत मिशन योजनेला हरताळ फासणारी असल्याचा आरोप करत दि.२० ऑक्टोबर रोजी पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता.याची तात्काळ दखल घेत गटविकास अधिकारी श्री. अशोक राठोड यांनी स्पष्ट केले की, संबंधित स्वच्छतागृह दुरुस्तीच्या कामामुळे तात्पुरते बंद करण्यात आले होते. पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाचे काम पूर्ण करून ते पुन्हा सुरू करण्यात आले आहे. तसेच फक्त पुरुषांसाठी अशी नोटीस अनवधानाने न काढल्याची कबुली देत ती हटविण्यात आली असल्याचेही त्यांनी लेखी पत्रकाद्वारे डॉ. ढवळे यांना कळविले आहे.यानंतर महिलांसाठीचे स्वच्छतागृह पुन्हा खुले करण्यात आल्याने महिला कर्मचाऱ्यांसह अभ्यागतांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यामुळे सोमवार, दि.२० रोजी होणारे पंचायत समितीला कुलूप ठोका आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

## सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

डॉ. कलाम हे केवळ एक महान वैज्ञानिक नव्हते, तर ते प्रत्येक भारतीयाच्या हृदयातील प्रेरणेचा झरा होते.त्यांनी अत्यंत गरिबीमध्ये बालपण घालवले, पण मोठे स्वप्न पाहिले आणि त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या जीवनाने आपल्याला शिकवले की मोठे स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्या.डॉ.कलाम यांनी सांगितले होते की झोपेत पाहिलेले नव्हे तर आपल्याला जागे ठेवणारे स्वप्नच खरे असते.त्यांनी विज्ञानाच्या माध्यमातून भारताला बलशाली बनविण्यासाठी कार्य केले.मिसाईल तंत्रज्ञान,अंतराळ संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान अमूल्य आहे. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांचे साधेपण आणि विद्यार्थ्यांवरील प्रेम होते. ते म्हणायचे प्रत्येक विद्यार्थ्यात एक क्षमता दडलेली असते, फक्त ती ओळखून मेहनत घेण्याची गरज आहे.असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सय्यद यांनी केले.भारताचे माजी राष्ट्रपती व 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी मुख्याध्यापक सय्यद नौशाद, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़मा, शेख यास्मीन व शेख सुलताना आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक असलम पटेल यांनी करताना आपणही आपल्या जीवनात काहीतरी मोठे करू, प्रामाणिकपणे परिश्रम घेऊ आणि देशाच्या विकासासाठी योगदान देऊ असे सांगितले.

## आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भिमाशंकर होम अप्लायसेंस चे उद्घाटन संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । प्रतिनिधी**

उस्माननगर चौक ता.कंधार येथे नव्याने सुरू केलेल्या भीमाशंकर होम अप्लायसेंस चे उदघाटन कंधार लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी संबोधित करताना आमदार चिखलीकर साहेब म्हणाले प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात नवीन व्यवसाय सुरू करणे हा एक महत्वाचा टप्पा असतो. या टप्प्यावर पोहचत असताना मोठा संघर्ष त्याच्या पाठीशी असतो. या सुखाच्या क्षणात सहभागी होता येणे महत्वपूर्ण आहे. व्यवसाय सुरू केला व रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल आभार ही व्यक्त करतो. साईनाथ पाटील कपाळे यांच्या या नवीन व्यवसायास मनःपूर्वक शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

यावेळी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब, अवधूत बन महाराज, हपभ चंद्रकांत महाराज लाठकर, दिलीप पाटील बेटमोगरेकर, शिवराज पाटील रातोळीकर, स्वप्निल लुंगारे, वारकड गुरुजी, भास्कर जिगळेकर, दत्ता पाटील हळदेकर, गोविंदराव नांदेडे, शिवाजीराव पाटील कपाळे, शंकर ढगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत नाही; काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ-विजय वडेट्टीवार

**दैनिक वादळ वार्ता**
**नागपूर (वृत्तसंस्था)**

अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी मदत मिळण्याची आता शक्यता नाही.राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी ही काळी दिवाळी म्हणून साजरी करावी लागेल अशी परिस्थिती सरकारने शेतकऱ्यांवर आणली आहे. आता जो कापूस निघतो आहे त्याला केंद्र सरकारने परवानगी दिलेली नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांना साडेतीन लाख रुपये देऊ हा सरकारचा ३ वर्षांचा कार्यक्रम आहे. जर ३ वर्षे शेतकरी जमिनीची दुरुस्ती करत राहील तर तो खाणार आणि जगणार कसा? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये सरकारी तिजोरीतून केवळ साडे ६ हजार कोटी रुपये जाणार आहेत. त्यापेक्षा एकही रुपया जास्त भार सरकारवर पडणार नाही. दिवाळीपूर्वी मदत होईल असे आता वाटत नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, कापूस खरेदीसाठी अटी टाकण्यात आल्या होत्या त्या रद्द कराव्या ही आमची मागणी आहे. तसे झाले नाही तर व्यापाऱ्यांना कमी भावात कापूस द्यावा लागेल आणि शेतकऱ्यांचे नुकसान होईल. महायुती सरकारला जनाची नाही तर मनाची लाज वाटत असेल तर त्यांनी शेतकऱ्यांचा इतका छळ करु नये. आमची सरकारकडे विनंती आहे,शेतकऱ्यांना मदत करा. शेतकऱ्यांनी दिवाळीच्या दिवशी काळी दिवाळी म्हणून एक तास काळी दिवाळी साजरी करावी आणि सरकारचा निषेध करावा. मदतीचा कुठेही उल्लेख नाही, आणि जी आर बदल करण्यात येत आहे असा आरोप वडेट्टीवारांनी केला आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील २६८ तालुक्यांपैकी २५३ तालुक्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. त्यांचा पूर्णत: नुकसानग्रस्त म्हणून समावेश केला होता. ९ तारखेच्या जी आरमध्ये ज्या सवलती होत्या जमीन महसूलमध्ये सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीच्या निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.तिमाही विजबील माफी, १० वी १२ वीच्या परीक्षा शुल्क माफी हे निर्णय घेण्यात आले होते. परंतू ९ तारखेला हा जी आर घाई-घाई मध्ये काढला असेल.

## नांदेडचे शेतकरी दु:खात आणि जिल्हाप्रशासन करतेय दिवाळी पहाटचा आनंदोत्सव साजरा



**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील गावखेड्यातील शेतकरी ऐन दिवाळीत आर्थिक मदत मिळाली नसल्याने दुःख व्यक्त करत असताना नांदेडचे जिल्हाप्रशासन दिवाळी पहाटच्या नावाखाली भला मोठा आनंदोत्सव साजरा करत आहे. नांदेड प्रशासनाला शेतकऱ्याबद्दल थोडीही सहवेदना का जाणवत नसेल...आमच्या दुःखात पण यांना खूप आनंद साजरा करावासा का वाटत असेल. हे शहरी बाबू लोक एव्हढे निर्दयी कसे काय झाले असतील हो.तुमच्या दिवाळीची आनंदी पहाट साजरी होत असताना आमच्या मात्र आमच्या दिवाळीची पहाट काळी काळी दिसत्येय नांदेड जिल्हातील शेतकरी

# आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाहिली श्रद्धांजली







**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरीचे आमदार स्वर्गीय शिवाजीराव भानुदास कर्डिले यांच्या पार्थिवावर बुऱ्हाणनगर येथील त्यांच्या निवासस्थाना समोरील प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे यांनी त्यांच्या पार्थिवास पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.पोलीसांच्या पथकाने हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. त्यांच्या पार्थिवास मुलगा अक्षय यांनी मुखाग्नी दिला. सात्वंनपर भावना व्यक्त करतांना सभापती प्रा.राम शिंदे म्हणाले, दिन-दलित, शोषीत, गरीब , कष्टकऱ्यांच्या पाठिशी ते नेहमीच ठामपणे उभे राहिले. सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी उत्तुंग असे काम केले. सर्वसामान्यांच्या मनात त्यांच्याविषयी अपार , प्रेम व स्नेह होता. त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, शिवाजीराव कर्डिले हे जनसामान्यांशी नाळ जोडलेले, तळागाळातील घटकांच्या विकासासाठी झटणारे नेतृत्व होते. त्यांचा पिंड समाजकारण व राजकारणाचा होता. ते नेहमीच लोकांमध्ये वावरले. त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यातून त्यांना सावरण्याचे बळ मिळो, ही प्रभू चरणी प्रार्थना करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात जिल्हावासिय सहभागी आहेत. यावेळी त्यांच्या पार्थिवाचे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठल लंघे,आमदार अमोल खताळ,आमदार मोनिका राजळे, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार सुरेश धस, आमदार शरद सोनवणे, आमदार राहुल कुल, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली वाहिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे यांनी अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी जंगले महाराज, आदिनाथ महाराज व बाळासाहेब थोरात यांनी सांत्वनपर भावना व्यक्त केल्या.त्यांच्या अंत्यसंस्कारास राजकीय, सामाजिक, उद्योग, कला, साहित्य, सांस्कृतिक आदी क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ सक्रिय भूमिका बजावली. त्यांनी सहा वेळा महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून काम पाहिले. जुलै २००२ ते जुलै २००४ या काळात ते मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाचे राज्यमंत्री होते, तर जुलै २००४ ते ऑक्टोबर २००४ या काळात त्यांनी जलसंधारण, वने, महिला व बालविकास, भूकंप, पुनर्वसन आणि मदतकार्य या विभागांचे राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. २००४ मध्ये ते अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री होते. तसेच, त्यांनी सहकार क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले असून २००७ पासून अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक आणि २००८-०९ तसेच मार्च २०२३ पासून चेअरमन म्हणून त्यांनी कार्य केले. राज्य शासकीय समित्यांमध्ये त्यांनी रोहयो, पंचायतराज व सार्वजनिक उपक्रम समितीचे सदस्य म्हणूनही काम पाहिले. त्यांच्या सार्वजनिक कारकिर्दीची सुरुवात ग्रामपंचायत बु-हाणनगरच्या सरपंचपदापासून झाली, जिथे ते १९८४ ते १९९६ या काळात कार्यरत होते.


# केज तालुक्यात नामेवाडी व केज येथे झालेल्या अपघातात दोन जण ठार

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नामेवाडी येथे शनिवारी दि.१८ ऑक्टोबर रोजी दुपारी साडे तीन वाजण्याच्या एका ट्रॅक्टरने दुचाकीला धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील शालेय विद्यार्थी जागीच ठार झाला तर त्याच्या मामाच्या दोन्हीही पायावरून ट्रॅक्टरचे टायर जाऊन गंभीर जखमी झालेल्या मामाला अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

केज तालुक्यातील नामेवाडी येथील सचिन महादेव वायबसे या शेतकऱ्याने साखर कारखान्याला ऊसतोडणी साठी ट्रॅक्टरलावण्यासाठी शुक्रवारी नवीन ट्रॅक्टर खरेदी करून नामेवाडीत आणला होता.दरम्यान शनिवारी दुपारी सचिन वायबसे यांनी शिंदी फाट्यावरील ढाब्यावर दारू पिवून त ट्रॅक्टर चालवीत नामेवाडीकडे जात आसताना दुपारीं साडेतीन वाजण्याच्या दरम्यान घाटेवाडीला जाणाऱ्या रस्त्याजवळ समोरून दुचाकीवर येणाऱ्या मामा,भाच्याच्या दुचाकीला जोराची धडक देऊन झालेल्याअपघातात शालेय विद्यार्थी गणेश अशोक वायबसे वय १५ वर्षे रा.नामेवाडी हा जागीच ठार झाला.तर त्याचे मामा विठ्ठल रामदास आंधळे रा. आंधळेवाडी यांच्या पायावरून ट्रॅक्टरचे समोरचे टायर गेल्यामुळे त्यांचे दोन्हीही पाय निकामी झाले आहेत. दरम्यान रुग्णवाहिकेतून जखमी विठ्ठल रामदास आंधळे यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरज हजारे यांनी बोलताना दिली.तर मयत गणेश अशोक वायबसे याचे पार्थिव विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले.



## केज उपजिल्हा रुग्णालया समोर अपघातात एकजण ठार

शनिवारी रात्री सात वाजण्याच्या दरम्यान पिसेगाव येथील मजूर केज येथे मजुरीचे काम करून दुचाकीवरून आपल्या गावी परत जात असताना केज येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या जवळ सैन्य दलाच्या जाणाऱ्या वाहनाला त्याच्या दुचाकीचा धक्का लागून सुनिल माणिक लांडगे वय १९ वर्षे हा महामार्गावर पडलाअसता पाठीमागून येणारे वाहन त्याच्या पायावरून गेल्या मुळे सुनिल लांडगे या मजुराचा जागीच मृत्यू झाला असून त्याचे पार्थिव उपजिल्हा रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांनी बोलताना दिली.ऐन दिवाळीच्या पूर्व संद्येला दोन अपघातात दोघे जण ठार झाल्याची घटना केज तालुक्यात घडली आहे. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# स्वर्गीय शिवाजी कर्डिले यांच्या कुटुंबीयांचे महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडून सांत्वन

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुऱ्हाणनगर येथे आमदार स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

महसूलमंत्री श्री. बावनकुळे यांनी स्व. कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले, आमदार संग्राम जगताप तसेच कुटुंबातील इतर सदस्यांना धीर देत त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी स्व. शिवाजी कर्डिले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.या प्रसंगी माजी आमदार स्नेहलता कोल्हे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# गोर-गरीबांचा खरा कैवारी नरहरी काकडे उतरणार पंचायत समितीच्या रिंगणात

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

गोर-गरीब, असहाय्य जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत राहणारे समाजसेवक श्री नरहरी काकडे हे केज पंचायत समितीच्या उमरी गणातून निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. स्वतःच्या संसाराचा विचार न करता लोकहितासाठी समर्पित राहिलेल्या या समाजसेवकाने आपल्या कार्यातून जनतेच्या मनात ठसा उमटवला आहे.

साबला गावचे सुपुत्र असलेले काकडे सर शिक्षक असूनही समाजकार्याला आपले जीवन वाहून घेतले आहे. शैक्षणिक मदत, आरोग्यसेवा, गरीबांच्या विवाहासाठी साहाय्य,



अशा विविध माध्यमातून त्यांनी असंख्य कुटुंबांना दिलासा दिला आहे. त्यांच्या सोबत पत्नी व साबला गावच्या सरपंच सौ. जनाबाई काकडे यांचेही योगदान मोलाचे आहे.

जनतेच्या मनात दिनांचा कैवारी म्हणून ओळख निर्माण केलेल्या या दांपत्याने गावाचा सर्वांगीण विकास साधला आहे. स्वच्छता मोहीम, सिमेंट रस्ते, वृक्षारोपण, जलजीवन योजना, शाळांची दुरुस्ती अशा अनेक विकासकामांतून साबला गाव आज जिल्ह्याच्या नकाशावर उजळून निघाले आहे. जनसेवेची तळमळ, प्रामाणिकता आणि निस्वार्थ वृत्ती या गुणांमुळे नरहरी काकडे हे आज पंचायत समिती निवडणुकीत जनतेच्या आशेचे प्रतीक ठरले आहेत.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्तक्षेपामुळे सुरक्षा रक्षकांना दिलासा

## निर्माणाधीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील थकीत वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी

दैनिक वादळ वार्ता

चंद्रपूर । प्रतिनिधी

निर्माणाधीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे कार्यरत सुरक्षा रक्षकांचे मागील तीन महिन्यांचे वेतन प्रलंबित असल्याने या कामगारांवर आर्थिक संकट ओढावले होते. या पार्श्वभूमीवर सुरक्षा रक्षकांच्या प्रतिनिधी मंडळाने आमदार किशोरभाऊ जोरगेवार यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचनेनुसार शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता मिलिंद कांबळे यांनी बैठक घेऊन सुरक्षा रक्षकांच्या मागण्या मान्य केल्या आहेत.या बैठकीला भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष



कासनगोट्टूवार, भाजप नेते प्रकाश देवतडे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, महामंत्री मनोज पाल, रवी गुरुनुले, शेखर शेट्टी, उग्रसेन पांडे, सूरज ठाकूर यांच्यासह सुरक्षा रक्षकांची उपस्थिती होती.

विविध मागण्यांना घेऊन सदर सुरक्षा रक्षकांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांची भेट घेतली होती. सुरक्षा रक्षकांचे म्हणणे ऐकल्यानंतर आमदार जोरगेवार यांनी तात्काळ या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. त्यांनी तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून तातडीने बैठक बोलावण्याच्या सूचना केल्या. त्यांचा पुढाकार नंतर आज शनिवारी महाविद्यालयात अधिष्ठात्यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधी, संबंधित कंत्राटदार आणि प्रशासनिक अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

या चर्चेत संबंधित कंत्राटदाराने सुरक्षा रक्षकांचे मागील तीन महिन्यांचे थकीत वेतन ५ तासात अदा केले जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच आगामी काळात वेतन नियत वेळेत नियमितपणे अदा करण्याची ग्वाहीही कंत्राटदाराने दिली. आमदार जोरगेवार यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, सुरक्षा रक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी सुरक्षा रक्षकांनी आमदार जोरगेवार यांचे आभार मानत, त्यांच्या प्रयत्नांमुळेच आमच्या घरात दिवाळीच्या आधी प्रकाश आला, अशी भावना व्यक्त केली.

# विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला:छगन भुजबळ

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला, अशी टीका मंत्री छगन भुजबळ यांनी बीडच्या महाएल्गार सभेत बोलताना केली आहे. तसेच विखे पाटील हे गरज नसताना मनोज जरांगेंकडे जातात. भाजपच्या लोकांना मला सांगायचे आहे की तुमच्या लोकांना आवरा. मराठा समाज आणि आमच्या अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, अशी टीका भुजबळ यांनी केली आहे. छगन भुजबळ म्हणाले, आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. हिशोब करा राज्यात ५४ टक्के ओबीसी,१३ टक्के दलीत, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण त्यानंतर मुस्लिम आणि जे शिल्लक राहतात तो मराठा समाज, अशी माहिती भुजबळ यांनी दिली. तसेच आता दुहेरी लढाई लढणार, एक न्यायालयात आणि दुसरी रस्त्यावरची लढाई. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथे फक्त ओबीसीसाठी



लढा देत आहोत. पक्षाचे काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा, असा इशारा भुजबळ यांनी दिला.

मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही असे भुजबळ म्हणाले. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकदीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळे यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले.


# मानमोडी पाझर तलावाला मोठे भगदाड; शेतकरी चितींत!

## पाटबंधारे विभागाचा भ्रष्टाचाराचा कारभार उघड

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

केज सज्जातील मानमोडी पाझर तलावात मोठे भगदाड पडल्याने परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. तलावातील साठवलेले पाणी काही तासांत बाहेर पडल्याने आसपासच्या शेतीला पाण्याचा पुरवठा ठप्प झाला असून, शेतकऱ्यांचे पीक धोक्यात आले आहे.या घटनेनंतर ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी तातडीने पाटबंधारे विभागाकडे संपर्क साधला, मात्र विभागाच्या कार्यालयात गेल्यावर नागरिकांच्या संतापाचा पारा चढला. कारण कार्यालयात एकही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नव्हता. हालचाल रजिस्टरवर कोणतीही नोंद नव्हती. चौकशीअंती शिपायाने दिलेले उत्तर धक्कादायक ठरले – साहेब साइटवर गेले आहेत.तलावातील भगदाडामुळे शेतकऱ्यांची मोठी हानी होण्याची शक्यता आहे. गेल्या



काही वर्षांत पाझर तलावाची दुरुस्ती न केल्याने आणि निकृष्ट कामामुळे हे भगदाड पडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामागे पाटबंधारे विभागातील भ्रष्टाचार व निष्काळजीपणाच जबाबदार असल्याचे शेतकरी खुलेपणे बोलू लागले आहेत.स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे. तलावातील पाणी वाहून गेल्याने आमचे पीक वाचणार नाही. भ्रष्टाचारामुळेच आज आम्ही संकटात आहोत. – स्थानिक शेतकरी, मानमोडीमानमोडी पाझर तलावातील भगदाडामुळे केज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या असून, पाटबंधारे विभागाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# आ.कर्डिले साहेब यांच्या निधनामुळे धक्का बसला, डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली हळहळ

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आणि ज्येष्ठ नेते शिवाजीराव कर्डिले यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. फक्त ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.कालच आमदार कर्डिले हे डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निवासस्थानी गेले होते. एकत्र जेवण, संवाद आणि विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर काही तासांतच त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

ही वार्ता हृदय पिळवटून टाकणारी आहे. अजूनही मला विश्वास बसत नाही की ही घटना घडली आहे. कालच आम्ही एकत्र होतो आणि आज ते आपल्यात नाहीत, हे स्वीकारणं कठीण आहे, अशी



प्रतिक्रिया डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.ते पुढे म्हणाले, कर्डिले साहेबांशी आमचे मैत्रीपूर्ण संबंध संपूर्ण जिल्ह्याला ठाऊक आहेत. विखे आणि कर्डिले परिवार मागील अनेक दशकांपासून एकत्र राहिले आहेत. राजकीय क्षेत्रात आम्ही नेहमी खांद्याला खांदा लावून काम केलं. माझ्या दृष्टिकोनातून ते अहिल्यानगर जिल्ह्याचे एक राजकीय गुरु होते. त्यांच्या जाण्याने केवळ आम्हीच नव्हे तर संपूर्ण महायुती आणि भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे.शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासात सहकार, शेती, शिक्षण आणि पायाभूत विकास क्षेत्रात अमूल्य योगदान दिलं. अहमदनगर जिल्हा बँकेचे चेअरमन, राज्यमंत्री आणि जनतेचे खरे हितचिंतक म्हणून त्यांनी लोकांशी थेट नाळ जोडली होती. साधेपणा, लोकाभिमुख कार्यशैली आणि प्रामाणिक सेवाभाव या गुणांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व उठून दिसलं.त्यांच्या जाण्याने केवळ एक जननेता हरपला नाही, तर जनसेवेची एक परंपराच खंडित झाली आहे. त्यांचे आदर्श आणि कार्यशैली हीच आपल्यासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या विचारांची वाटचाल पुढे नेणं हेच त्यांच्याप्रती खरं श्रद्धांजलीचं रूप ठरेल, असं डॉ. विखे पाटील म्हणाले.परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या परिवारास लाभो, अशा शब्दांत डॉ. विखे पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077